बुधवार, दि १८ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २४ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### पीसीएम व इंजअच्या आंदोलनला मोठे यश

# पत्रकार भरत मानकर यांना धक्काबुक्की गुत्तेदाराला भोवली; पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत जालन्यात पहिला गुन्हा दाखल

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा परिषद बांधकाम विभागात पत्रकार भरत मानकर यांना अर्वाच्च शिवीगाळ, धक्काबुक्की व जीवे मारण्याची धमकी एका गुत्तेदारांने दिल्याची घटना सोमवार (दि २) रोजी घडली होती. त्यासंदर्भात भरत मानकर यांनी कदीम जालना पोलीसांत तक्रार दाखल केली होती. असे असले तरी कदीम जालना पोलीसांकडून गुन्हा दाखल करण्यास विलंब होत होता. अशावेळी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके व इंडियन जर्नलिस्ट असो. चे जालना जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर मंगळवार (दि १७) रोजी एक दिवसीय लक्षवेधी आंदोलनचा ईशारा दिला होता. या आंदोलनाच्या ईशाऱ्यानंतर पोलीस प्रशासन खडबडून जागे झाले आणि मंगळवार (दि १७) रोजी आंदोलनाला सुरुवात करण्यापुर्वीच गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन देत कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार भरत मानकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दीपक शेळके व आमेर खान यांच्या आवाहनानंतर मंगळवार (दि १७) रोजी सकाळी दहा वाजल्यापासून पत्रकार बांधव पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर जमा होण्यास सुरुवात झाली होती. त्यानंतर तातडीने जालना तालुका पोलीस ठाण्याचे अधिकारी व पोलीस उपविभागीय अधिकारी यांच्या मध्यस्थीनंतर कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आश्वासन श्री शेळके व आमेर खान व तक्रारदार भरत मानकर यांना देण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व पत्रकारांनी कदीम जालना पोलीस ठाणे गाठले. कदीम जालना पोलीस ठाण्यात पत्रकार भरत मानकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल केल्यानंतर पत्रकार एकजुटीचा विजय असो अशा घोषणाबाजी करण्यात आली.

दिलेल्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे की, दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी एक वाजता जिल्हा परिदष बांधकाम विभाग येथील कर्मचारी सहाय्यक लेखा अधिकारी श्री हरुण यांच्या कॅबिनमध्ये बातमीच्या अनुषंगाने जिल्हाभर सुरु असलेल्या कामांची माहिती घेत असतांना तेथे बांगड नावाचे गुत्तेदार आले. व त्यांनी भरत मानकर यांना उद्देशुन कोण मादर... पत्रकार आहे. खुप मोठा पत्रकार लागून गेला का अशा घाणेरड्या भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. व तुझे हात पाय तोडुन टाकु तुला लय मस्ती आली का? विनाकारण आमच्या कामाची माहिती घेऊन बातम्या करु नको असे म्हणून श्री मानकर यास धक्काबुक्की करुन जीवे मारण्याची धमकी दिली. यावर तेथे असलेले जि.प. कर्मचारी श्री हरुण, विक्की हिवाळे, विष्णु कदम यांनी सोडवासोडवी केली. व श्री हरुण यांनी श्री मानकर यांना टेंशन न घेण्याचा सल्ला देत घरी जाण्यास सांगितले त्यावर श्री मानकर तेथून निघून गेले. श्री बांगड हे जालना येथील घायाळ नगर येथील रहीवासी असल्याचे फिर्यादीत नमूद असून श्री मानकर यांच्या या फिर्यादीवरून भारतीय न्यास संहिता २०२३ नुसार ३५२ व महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक) अधिनियम २०१७ नुसार ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास



पोलीस उपविभागीय अधिकारी अनंत कुलकर्णी हे करणार आहेत.

प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, इंडियन जर्नलिस्ट असो. जालना जिल्हाध्यक्ष आमेर खान, मराठी पत्रकार संघाचे अभयकुमार यादव, स्मॉल ॲण्ड मिडीयम असोचे ओमप्रकाश शिंदे, अमीत कुलकर्णी, पत्रकार सुहास वैद्य, जावेद खान, विष्णु कदम, सुनील भारती, शेख चाँद पी.जे., गणेश जाधव, शब्बीर पठाण, निकिता काळे, शेख महेजबीन, सचिन सर्वे, सुयोग खर्डेकर, सुनील नरवडे, रुस्तम शेख, शिवाजी बावणे, गणेश सपकाळ, आरेफ सय्यद, अजीम पठाण, बालाजी अडीयाल, शेख शकील, संतोष भुतेकर, राहुल मुळे, नाजीम मणियार, आयेशा खान मुलाणी, साहिल पाटील, विलास गायकडवाड, तौफीक पठाण, शेख उमर, शिवाजी शिंदे, सलमान खान, शंकर शिरगुळे, शेख ईलीयास अब्बास, अशफाक पटेल यांच्यास उपस्थित सर्व पत्रकार व पत्रकार संघटनेसह आम आदमी पक्षाचे सुभाष बोर्डे, मराठा महासंघाचे अरविंद देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रा सोपान तेलगड यांचे भरत मानकर यांनी आभार व्यक्त केले.

या घटनेत पत्रकार भरत मानकर यांना जीवे मारण्याची धमकी दिली आणि शारीरिक हल्ला केला. पत्रकारांच्या हक्कांची आणि सुरक्षेची मागणी करणाऱ्या पत्रकार संघटनांच्या दबावामुळे, पोलीस प्रशासनाने तातडीने गुन्हा दाखल केला. प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि इंडियन जर्नलिस्ट असो.च्या नेतृत्वाखालील संघर्षामुळे या प्रकरणाला न्याय मिळवण्यात मदत झाली.

प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि इंडियन जर्नलिस्ट असो.ने पोलिस प्रशासनावर दबाव टाकून घटनास्थळी तातडीने कारवाई करायला भाग पाडले. या घटनेत पत्रकार संघटनांनी आंदोलने करून पोलीस प्रशासनाला जागे केले, ज्यामुळे त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊले उचलली गेली. पत्रकारांवरील हल्ल्याच्या घटनेवर भारतीय दंड संहितेच्या ३५२ व महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक) अधिनियम २०१७ चे लागू होणे, एक महत्त्वपूर्ण कायदेशीर व सामाजिक संदेश आहे.

या प्रकरणात पत्रकार संघटनांच्या एकतेनेच परिणामकारक लढाई लढली, ज्यामुळे सरकार आणि पोलिस प्रशासनावर योग्य दबाव आला. विविध पक्षांचे कार्यकर्ते व पत्रकार संघटनांचे एकत्र येणे, एक सामाजिक आंदोलन म्हणून महत्त्वपूर्ण ठरले. हे प्रकरण पत्रकारांच्या सुरक्षा आणि हक्कांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण आहे. पत्रकार संघटनांचे सक्रिय योगदान आणि एकजुटीने सरकार आणि प्रशासनावर योग्य दबाव निर्माण केला, त्यामुळे घटनास्थळी कायदेशीर कारवाई लवकर केली गेली. यापुढे पत्रकार संरक्षण कायद्याचे अधिक प्रभावीपणे पालन होईल अशी आशा व्यक्त केली जाऊ शकते.

## पत्रकारांवर हात उगाराल तर कायद्याचा हात अधिक कठोर असेल - ॲड ईलियास अब्दुलमजीद खान

जिल्हा परिषद बांधकाम विभागात पत्रकारावर झालेली शिवीगाळ, धक्काबुक्की आणि जीवे मारण्याची धमकी ही अत्यंत गंभीर व लोकशाही व्यवस्थेला काळिमा फासणारी घटना आहे. याबाबत प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्रचे जनरल सेक्रेटरी ॲड. ईलियास अब्दुलमजीद खान यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला आहे.

पत्रकार हा समाजाचा डोळा आणि कान असतो. तो विकासकामांची माहिती घेतो, प्रश्न विचारतो आणि जनतेसमोर सत्य मांडतो. हे त्याचे कर्तव्य आहे, गुन्हा नाही. सार्वजनिक कार्यालयात जाऊन अधिकृत माहिती घेणाऱ्या पत्रकाराला शिवीगाळ करणे, धमक्या देणे आणि धक्काबुक्की करणे म्हणजे थेट लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर हल्ला होय, असे ड. खान यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, राज्यात पत्रकारांच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र प्रसार माध्यम व्यक्ती आणि प्रसार माध्यम संस्था (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक) अधिनियम, २०१७ हा विशेष कायदा अस्तित्वात आहे. या कायद्यांतर्गत पत्रकारांवर हल्ला करणे हा अजामीनपात्र व गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. त्यामुळे संबंधित प्रकरणात केवळ औपचारिक गुन्हा दाखल करून भागणार नाही; तर तत्काळ अटक करून कठोर कारवाई व्हायलाच हवी. पत्रकारांना गप्प बसवण्याचा, धमकावण्याचा किंवा दडपण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. समाजानेही या प्रकरणात पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. कारण आज पत्रकारावर हल्ला झाला, तर उद्या सत्यावर हल्ला होईल, असा रोखठोक इशारा देत ड. खान यांनी प्रशासनाने या प्रकरणात ठोस आणि उदाहरणार्थ कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

## पत्रकारांची एकजुट कायम राहावी - आमेर खान

पत्रकार भरत मानकर यांच्या फिर्यादीवरून पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला हा पत्रकार एकजुटीचाच विजय आहे. पत्रकारांनी दाखविलेली एकजुट कायम राहावी अशी अपेक्षा इंडियन जर्नलिस्ट असो. जालना जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी व्यक्त केली. त्याच बरोबर जिल्ह्यातील पत्रकारांच्या हक्कासाठी आपण कायम पत्रकारांसोबत राहू असे आश्वासन देत. भविष्यात पत्रकारांसाठी विमा काढण्यासह, आरोग्य शिबीरासह विविध शिबीरे आयोजित करण्यात येतील. असेही इंडियन जर्नलिस्ट असो जिल्हाध्यक्ष आमेर खान यांनी म्हटले आहे.

## पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी कायम लढत राहणार - दीपक शेळके

जालना जिल्ह्यातील पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी कायम लढत राहणार असल्याची प्रतिक्रिया प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्रचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी माध्यमांशी बोलतांना दिली. गेल्या पंधरा दिवसांपासून पत्रकार भरत मानकर यांनी तक्रार दिल्यानंतरही गुन्हा दाखल होत नसल्याने कॉन्सीलच्या वतीने तसेच शहरातील सर्व पत्रकारांच्या माध्यमातून मंगळवारी आंदोलनचा ईशारा दिला होता. आंदोलनापुर्वीच पोलीसांनी दखल घेतली, आंदोलन न करण्यासाठी तालुका पोलीस ठाणे, कदीम जालना पोलीस ठाण्याचे अधिकारी सांगत असतांना जो पर्यंत गुन्हा दाखल होत नाही तो पर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा पावित्रा आम्ही घेतला होता. त्यावर सकाळीच तातडीने श्री मानकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. हा पत्रकार एकजुटीचा मोठा विजय आहे. पत्रकारांनी दाखविलेली एकजूट कायम अशीच राहिल्यास भविष्यात पत्रकारांना शिवीगाळ करणे, धमकावणे, धक्काबुक्की करणे अथवा मारणे यासारख्या प्रकाराला आळा बसेल. पुढेही पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी काम लढत राहू येत्या काही दिवसात शासन मान्य यादीत सामाविष्ट असलेल्या वृत्तपत्रांना दरवाढ मिळणे, ज्येष्ठ पत्रकारांना पेन्शन मिळवून देणे, ग्रामीण भागातील पत्रकारांना अधिस्विकृती पत्रिका मिळवून देणे यासाठी जालन्यातून मोठा लढा उभा करणार असल्याचेही कॉन्सीलचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी यावेळी सांगितले.

## संपादकीय

# भारतीय संघ इतिहास डिफिट आणि रिपीट करणार ?

टी २० विश्वचषक स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवत सुपर ८ मध्ये दिमाखात प्रवेश केला. रविवारी झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानला अक्षरशः चारी मुंड्या चीत केले. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रात भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवत हा सामना जिंकला. या सामन्यात पाकिस्तान भारताच्या जवळपासही पोहचू शकला नाही. हा विजय मिळवून भारताने पाकिस्तानवरील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. विश्वचषकात पाकिस्तान भारताला फक्त एकदाच हरवू शकला. भारताने मात्र पाकिस्तानला तब्बल ८ वेळा हरवले आहे. या सामन्यात भारताचा सलामीवीर ईशान किशनने वादळी सुरवात करून भारताला पावणे दोनशेचा टप्पा गाठून दिला. त्याने आक्रमक अर्धशतक झळकावले त्याला सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, तिलक वर्मा, रिंकू सिंग यांनी चांगली साथ दिली. भारतीय गोलंदाजांनी तर कमाल केली. भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानच्या फलंदाजानी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा कोणताच फलंदाज भारतीय गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही. जसप्रीत बुमरा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव या भारताच्या सर्व प्रमुख गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करून पाकिस्तानी फलंदाजांना जेरीस आणले. पाकिस्तानचे फलंदाज कसेबसे शतक पार करून शकले. पाकिस्ताला नमवण्यापूर्वी भारताने अमेरिका आणि नामिबियालाही असेच एकतर्फी नमवून विजय मिळवला होता. आज भारताचा नेदरलँडशी मुकाबला आहे. हा मुकाबला ही भारत एकतर्फी जिंकेल यात शंका नाही. आता भारत सुपर ८ मध्ये पोहचला आहे. विश्वचषकाची खरी लढाई आता सुरू झाली आहे असे म्हणावे लागेल कारण जगातील सर्वोत्तम आठ संघ सुपर ८ मध्ये असतील. तिथे लढाई सोपी नसेल कारण सर्वच संघ जिंकण्यासाठी खेळतील. टी २० क्रिकेटमध्ये कोण जिंकेल हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही कारण एखादे चांगले षटक किंवा एखादी छोटी पण महत्वपूर्ण खेळी सामन्याचे चित्र पालटवते भारत हा विजेतेपदाचा प्रबळ दावेदार आहे कारण या सर्व संघात भारतीय संघ तुफान फॉर्मात आहे. भारताची फलंदाजी इतर कोणत्याही देशांच्या फलंदाजी पेक्षा बळकट आहे. भारताचे गोलंदाजही लयीत आहेत. भारताचे वेगवान गोलंदाज असोत की फिरकी गोलंदाज सर्वच प्रतिस्पर्धी फलंदाजावर भारी पडत आहे. भारताचे क्षेत्ररक्षणही चांगले होत आहे. सूर्यकुमार यादव हा या संघाचे नेतृत्व कुशलतेने करत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे भारत आपल्या प्रेक्षकांसमोर आणि घरच्या मैदानावर खेळत आहे त्यामुळे त्याचा फायदा भारतीय संघाला मिळत आहे. याचाच अर्थ सर्व परिस्थिती भारतासाठी अनुकूल आहे. भारतीय संघाने या अनुकूल परिस्थितीचा फायदा उचलून संघाला विश्वविजयी करावे अशी अपेक्षा देशातील १४५ कोटी जनता करत आहे. भारताने जर तसे केले तर इतिहास घडेल. जर भारताने हा विश्वचषक जिंकला तर तीनवेळा विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरेल. याआधी असा पराक्रम कोणत्याही संघाने केला नाही म्हणजेच इतिहास रिपीट करेल.

# भेदभाव न बाळगता जनतेच्या उत्थानासाठी; शिवरायांच्या आदर्शाचे पालन राजकीय पुढाऱ्यांनी करावे

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती हा एक महाराष्ट्राचा उत्सवाचा सण असुन देशासाठी गौरवाचा आणि महत्वपूर्ण दिवस आहे. त्याचप्रमाणे जगाला गनीमीकाव्याची शिकवण छत्रपती शिवाजी महाराजांपासुन मिळाली आहे. त्यालाच आपण आज गोरीला वॉर सुध्दा म्हणतो. त्याची उत्पत्ती गनीमीकव्यातुनच झाली आहे.म्हणुनच जगात शिवाजी महाराजांच्या इतिहासाला आगळेवेगळे महत्त्व आहे. १९ फेब्रुवारीला देशासह संपूर्ण महाराष्ट्रात शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.सन १८६९ साली महात्मा जोतिबा फुले यांनी रायगडावरील शिवाजी महाराजांची समाधी शोधून काढली व त्यांच्या जीवनावर सर्वप्रथम पोवाडा लिहिला. शिवाजी महाराजांचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे यासाठी फुलेंनी सन १८७० साली शिवजयंतीची सुरूवात केली.ती पहीली शिवजयंती होती.त्यानंतर शिवजयंतीच्या माध्यमातून लोकांना एकत्र करण्याचे काम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. २० व्या शतकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील शिवजयंती साजरी केली व दोन वेळा शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या थाटात शिवजयंतीला सुरूवात झाली.महाराष्ट्र सरकारने २००१ पासून शके १५५१ (शुक्रवार १९फेब्रुवारी १६३०) ही शिवजयंतीची तारीख स्वीकारली त्यानुसार महाराष्ट्र सरकारने १९ फेब्रुवारी सार्वजनिक सुट्टी जाहिर केली.इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या दिनदर्शिकामध्ये शिवजयंतीची वेगवेगळी तारीख दाखवीली आहे. महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे आहे.मी तर म्हणेल की शिवजयंती रोज साजरी व्हावी आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवा तयार होतील. कारण शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने आणि स्वाभिमानाने जगत आहोत. गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे. शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा,हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने आणि स्वाभिमानाने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात. १९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली जाते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास,तुरंगी, इंद्रायणी,गाजर,रणभीर,कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड आपल्या अधिपत्याखाली आणले होते. काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी केंद्र व राज्य सरकारला आग्रहाची विनंती करतो करतो की महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे. यातच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताचे वैभव,धरोहर व शान आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हापुन्हा जागृत होतील.गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल. कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांचे जतन करणे गरजेचे आहे. कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.त्याचप्रमाणे त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. ३९६ वर्षांनंतर आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते. हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे. असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते. आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून धाराशाही करण्याचे काम शिवरायांनी व त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले. हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.महाराष्ट्रातील १२ गडकिल्ले युनेस्कोच्या यादीत समावेश करण्यात आले ही महाराष्ट्रासह देशासाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे.यामुळे जागतिक वारसा यादीत भारताचे नाव समाविष्ट झाले असून पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, महागाई,शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची व सुख-समृध्दीची जबाबदारी स्वीकारावी. यातच खरे शिवजयंतीचे महत्त्व दिसून येईल. त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपन करायला हवे.यामुळे संपूर्ण गडकिल्ले सुशोभित होईल व जिकडे-तिकडे आपल्याला हिरवागार गालीचा दिसून येईल. त्याचप्रमाणे शिवजयंतीच्या निमित्ताने बदलते हवामान लक्षात घेता वृक्ष लागवड सर्वच स्तरातून झाली पाहिजे.याकरीता प्रत्येक व्यक्तीने जर वृक्ष लागवड केली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला शिवाजी महाराजांचे दर्शन अवश्य होईल व त्यांच्या आठवणी अनंत काळापर्यंत टीकुण राहील.त्यामुळे शिवजयंतीचे औचित्य साधून सरकार, राजकीय पक्ष,शाळा -महाविद्यालये,सामाजिक संघटना,शिव भक्त व देशातील नागरिक यांनी प्रत्येकांनी एक तरी झाड लावले पाहिजे. यामुळे वाढत्या प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईलच व ऑक्सिजनची मात्रा वाढेल.त्याच प्रमाणे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. त्यामुळे एकाच दिवशी लाखो झाडे लावल्या जातील ही झाडे अनेक युगांपर्यंत सर्वांच्याच स्मरणात राहिल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त माझा मानाचा मुजरा.जय हिंद. हर हर महादेव =जय भवानी!जय शिवाजी!=

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com




**वाढत्या गुन्हेगारीला लगाम घालण्यासह शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या नेतृत्वात रॅपिड क्शन फोर्सद्वारे जालना शहरात रात्रीची गस्त सुरू करण्यात आली आहे. याबद्दल अनंत कुलकर्णी यांचे अभिनंदन करताना अरविंद देशमुख (राष्ट्रीय विभागीय सचिव, मराठा महासंघ) अशोकराव पडूळ (समन्वयक, मराठा क्रांती मोर्चा), किशोर आबा मरकड (मराठा सेवक), विश्वंभर तिरुखे पाटील (अध्यक्ष, शिवजयंती जन्मोत्सव समिती), अंकुशराव राऊत (ज्येष्ठ समाजसेवक) करण जाधव छायाचित्रात दिसत आहेत. दरम्यान, ही कारवाई करत असताना पोलीस प्रशासनाने सर्वसामान्य नागरिक, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि पत्रकार यांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी विनंतीही यावेळी करण्यात आली.**

# आ. अर्जुन खोतकर यांच्या पुढाकाराने २० फेब्रुवारीला भव्य 'जनता दरबार'

## नागरिकांच्या समस्यांवर जागीच तोडगा

**जालना । प्रतिनिधी -** जालना विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांच्या विविध शासकीय समस्या, प्रलंबित कामे व तक्रारींचे तात्काळ निराकरण व्हावे तसेच प्रशासन व नागरिक यांच्यात थेट संवाद प्रस्थापित व्हावा या उद्देशाने मा. आमदार अर्जुन खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य 'जनता दरबार' चे आयोजन करण्यात आले आहे.



स्थळ : संपर्क कार्यालय, भाग्यनगर, जालना
दिनांक : २० फेब्रुवारी २०२६
वेळ : सकाळी ११.00 वा.

या जनता दरबारमध्ये जिल्हास्तरीय सर्व प्रमुख अधिकारी व विभागप्रमुख उपस्थित राहणार असून महसूल, पोलीस, जालना महानगरपालिका, वीज वितरण, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, शिक्षण, कृषी, समाजकल्याण, महिला व बालविकास, जलसंपदा, पुरवठा आदी विभागांशी संबंधित प्रश्नांवर जागीच निर्णय घेण्यात येणार आहेत. आ. खोतकर यांनी नागरिकांना शासकीय कार्यालयांचे वारंवार फेरे मारावे लागू नयेत, त्यांच्या अडचणी तत्काळ मार्गी लागाव्यात व प्रशासन अधिक जबाबदार आणि लोकाभिमुख व्हावे या हेतूने हा उपक्रम राबविला आहे. संबंधित विभागांच्या निर्णयक्षम अधिकाऱ्यांना आवश्यक कागदपत्रे व प्रलंबित प्रकरणांची माहिती सोबत आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी आपल्या समस्या, अर्ज व संबंधित कागदपत्रांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**जनतेचा प्रश्न - जागीच निर्णय** या भूमिकेतून आयोजित करण्यात आलेला हा जनता दरबार जालना विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे. यावेळी नागरिकांनी शासनाकडे केलेले अर्ज, दाद याची छायाकित प्रत व इतर आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावी.

# शहरातील शिष्टेकडी परिसरातील घाणीचे साम्राज्य; नागरिक संतप्त

**जालना । प्रतिनिधी -** जालना : जालना शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील शिष्टेकडी परिसरात सध्या घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांना तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत, तर नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने परिसरात अस्वच्छतेचे चित्र निर्माण झाले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक दिवसांपासून कचरा उचलण्यासाठी कर्मचारी येत नाहीत. नाल्यांमध्ये साचलेल्या घाणीमुळे डासांचे प्रमाण वाढले असून साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना विशेषतः याचा त्रास सहन करावा लागत आहे. नुकतेच निवडून आलेले चारही नगरसेवक या भागात फिरकत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आम्ही मतदान करून प्रतिनिधी निवडले, पण आमच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. पुढील पाच वर्षे असाच त्रास सहन करावा लागणार का? असा संतप्त सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे. शिष्टेकडी परिसरात पाणीपुरवठ्याचाही प्रश्न तीव्र झाला आहे. नळाला वेळेवर पाणी येत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. या सर्व समस्यांकडे महानगरपालिका प्रशासनाने आणि जिल्हाधिकारी यांनी तातडीने लक्ष देऊन शिष्टेकडी परिसरातील कचरा त्वरित उचलावा, नाल्यांची साफसफाई करावी व पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.



# संत सेवालाल महाराजांचे विचार आजही समाजासाठी दीपस्तंभ - आमदार बबनराव लोणीकर

## संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त भव्य रॅली; बंजारा समाजाच्या हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**मंठा । प्रतिनिधी -** संत सेवालाल महाराज यांच्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, संत सेवालाल महाराज हे केवळ बंजारा समाजाचेच नव्हे तर संपूर्ण मानवतेचे थोर मार्गदर्शक होते. त्यांनी सत्य, अहिंसा, सेवा आणि नीतिमत्तेचा पुरस्कार करून समाजाला योग्य दिशा दिली. अंधश्रद्धा, व्यसन आणि वाईट प्रथा यांना विरोध करत त्यांनी समाजसुधारणेचा पाया मजबूत केला असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

संत सेवालाल महाराज जयंतीनिमित्त आज शहरात भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये बंजारा समाजासह विविध समाजातील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि संत सेवालाल महाराजांच्या जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय व उत्साहाने भारलेला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार बबनराव लोणीकर उपस्थित होते.

संत सेवालाल महाराजांनी 'सर्व मानव एक आहेत' हा अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला. जात, धर्म, भेदभाव यांच्या भिंती तोडून त्यांनी समाजात बंधुभाव, समता आणि माणुसकी रुजवली. आजच्या धकाधकीच्या व अस्वस्थ समाजात त्यांचे विचार अधिकच उपयुक्त ठरत आहेत. युवा पिढीने शिक्षण, प्रामाणिक कष्ट आणि सदाचार यांचा मार्ग स्वीकारून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे न्यावा, असे आवाहन लोणीकर यांनी केले.

बंजारा समाजातील शिक्षणाचा स्तर उंचावण्यावर भर दिला. व्यसनमुक्ती अभियान राबवून समाजाला सुदृढ बनवणे, महिलांना सन्मान व समानता देणे आणि सामाजिक ऐक्य मजबूत करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. संत सेवालाल महाराजांचे विचार समाजाला योग्य दिशा देणारे दीपस्तंभ असून त्यांच्या मार्गावर चालणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली असल्याचेही आमदार बबनराव लोणीकर नमूद केले.



संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सर्वांनी एकोप्याने राहून समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प घेतला. या भव्य रॅली व सभेमुळे परिसरात भक्ती, उत्साह आणि सामाजिक ऐक्याचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी भाजपा मंठा तालुका अध्यक्ष नितीन राठोड राजेश मोरे संदीप भैया गोरे वैजनाथ बोराडे अरुण वाघमारे पठाण दीपक बोराडे अरुण वाघमारे शरद मोरे सतीश बोराडे सचिन बोराडे जे के कुरेशी भाईजी बागवान नारायण राठोड राहुल राठोड गोकुळ राठोड पंकज राठोड गोपाल जाधव अविनाश जाधव योगीराज राठोड अमोल रामावत अमोल राठोड श्री चव्हाण अवि चव्हाण दीपक राठोड योगेश चव्हाण व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जालना शहरातील दिव्यांगाचे प्रश्न नियमानुसार सोडवणार महापौर वंदना मगरे यांचे दिव्यांग बांधवांना आश्वासन

### दिव्यांग बांधवांचा वतीने महापौर वंदना मगरे यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील दिव्यांगाचे प्रश्न नियमानुसार सोडणार असल्याचं आश्वासन जालन्याचे महापौर वंदना मगरे यांनी दिव्यांग बांधवांना दिले आहे जालना शहरातील दिव्यांगाना घरकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी दिव्यांगांना महानगरपालिका हद्दीत घर टॅक्स आणि पाणीपट्टी टॅक्स ५0% माफ करण्यात यावी महानगरपालिका कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावतील दिव्यांग कार्यालय तळ मधल्यात घेण्यात यावं महानगरपालिकेत दिव्यांगांसाठी व्हीलचेअर उपलब्ध करून देण्यात यावी अशा विविध मागण्यांचे निवेदन जालन्याचे महापौर वंदना मगरे यांच्याकडे सादर केले आहे दिव्यांगाच्या मागण्या नियमानुसार सोडणार असल्याचे आश्वासन महापौर मगरे यांनी दिव्यांग बांधवांना दिले आहे यावेळी दिव्यांग बांधवांच्या वतीने महापौर पदी वंदना मगरे यांची निवड झाल्याने दिव्यांग बांधवांचा वतीने वंदना मगरे यांचा सत्कार करण्यात आला आहे यावेळी सकल दिव्याग सामाजिक सघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे शिव सेना दिव्याग आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल मगदुले सगिता कोरडे सविता बोराडे राजेश कावेटी अनिल महापुरे जगदीश सातपुते विलास काबळे अकुश वाघचौरे शेख ईस्माल रेयान शेख निवृत्ती भालेकर उपस्थित होती.

### वायुवेग पथकाची अवैध गौण खनिज वाहतुकीवर मोठी कारवाई

## ४७ वाहनांवर दंडात्मक कारवाई; ९ लाखांहून अधिक दंड वसूल, दोन वाहने जप्त

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांच्या मार्गदर्शनाखाली, दि. ११ ते १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पर्यंत जालना जिल्ह्यात अवैध गौण खनिज वाहतुकीविरुद्ध व्यापक विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील विविध मार्गांवर काटेकोर तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान एकूण ४७ वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली असून सुमारे रु. ९,0७,२५0/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.



तपासणीवेळी विनानंबर प्लेट असलेले टिप्पर, तसेच विनापरवाना वाळू वाहतूक करणारी वाहने आढळून आली. नियमांचे सर्रास उल्लंघन करणाऱ्या अशा दोन वाहनांना जप्त करून त्यापैकी एक वाहन एसटी वर्कशॉप, जालना येथे तर दुसरे टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आले आहे. संबंधित वाहनांवर कायद्यानुसार पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

**संयुक्त कारवाईचा इशारा**

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी स्पष्ट इशारा देताना सांगितले की, अवैध गौण खनिज वाहतुकीमुळे शासनाचे मोठे आर्थिक नुकसान होत असून पर्यावरणीय हानीही होत आहे. त्यामुळे महसूल विभाग, पोलीस विभाग आणि परिवहन विभागाच्या संयुक्त समन्वयातून अशा कारवाया यापुढेही सातत्याने राबविल्या जाणार आहेत.

पथकाचा सहभाग या विशेष मोहिमेत मोटार वाहन निरीक्षक भीमराव नागरे, अनिल कदम, निलेश अहिरे, शुभम मोटे, अक्षय पाटील तसेच सहा मोटार वाहन निरीक्षक श्रीमती सोळुंके, राजपूत, अर्शन खान आणि चालक घुले, पारिस्कर, निळे, नावकीकर, देवकर यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. जिल्ह्यात अवैध वाळू आणि इतर गौण खनिज वाहतुकीवर नियंत्रण आणण्यासाठी प्रशासनाने घेतलेल्या या कठोर भूमिकेमुळे अवैध वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.

प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे जिल्ह्यातील अवैध खनिज वाहतुकीला आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

युवा आदर्श

### फोन रहीत...

मुश्किले एकदिवस
राहे सेलफोन रहीत
बोला विचित्र वल्ली
नोंदी गिनीज वहीत
क्षणभरात जगतास
नाव झाले रे माहीत
कसा केला उपवास
समस्त होती मोहीत
डोळे देतात धन्यवाद
पाहे बा आमचे हीत
विश्रांती अवयवांना
मिळाली अनपेक्षित
मानेचे दुखणे गायब
पिडले होते अनन्वित
नेटकरी सारे चकीत
निर्णय घेता अतर्कित
मोबाईल सुटके मुळे
काहीन घडे विपरित
जग चालले सुरळीत
फरट न होई आक्रित
ट्रोल करी रे नेटकरी
कॉमेंटस् रे अगणित
उपक्रम आवडे भारी
प्रसिद्धही दणदणीत

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## अभिनव जिगे याने जी मेन्स परिक्षेत मिळवले ९७ पर्सेंटाईल

**अंबड । प्रतिनिधी -** नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेण्यात आलेल्या जी मेन्स २०२६ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून,यामध्ये मठ पिंपळगाव (ता. अंबड )येथील अभिनव संतोष जिगे याने ९७ पर्सेंटाईल गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.या गुणांसह तो आयआयटी प्रवेशासाठीच्या 'जी डव्हान्स्ड' परीक्षेसाठी पात्र ठरला आहे. देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत अभिनवने आपल्या जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले असून या यशामुळे त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. ९७ पर्सेंटाईल गुण मिळवल्यामुळे त्याला देशातील नामवंत एनआयटी किंवा आयआयआयटी सारख्या संस्थांमध्ये अभियांत्रिकी प्रवेशाची संधी उपलब्ध झाली आहे. अभिनवने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व शिक्षकांना दिले आहे. अत्यंत शिस्तबद्ध अभ्यास आणि सातत्य यामुळेच हे यश मिळाल्याचे त्याने सांगितले.आता 'जी डव्हान्स्ड' परीक्षेत यश मिळवून आयआयटीमध्ये प्रवेश मिळवणे हे त्याचे पुढील ध्येय आहे.



या यशाबद्दल अभिनवचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## शिवसेना जालना विधानसभा अध्यक्ष पदी दिनकर घेवंदे यांची नियुक्ती...!

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते मा. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिवसेना उपनेते तथा मा. राज्यमंत्री श्री. अर्जुनरावजी खोतकर साहेब , श्री. अभिमन्यू खोतकर युवासेना सचिव महाराष्ट्र राज्य यांचे आदेशाने जालना विधानसभा अध्यक्ष म्हणून दिनकर दादा घेवंदे यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी , दलीत आघाडी व पक्ष आणि संघटना हिताचे काम दिनकरराव घेवंदे हे चांगल्या पद्धतीने करतील अशी अपेक्षा मा. श्री.अर्जुनराव खोतकर, जिल्हाप्रमुख श्री.भाऊसाहेब घुगे, संपर्क प्रमुख श्री. भास्करराव आंबेकर यांनी केली आहे.

## छत्रपतींच्या जयंतीनिमित्त मर्दानी जोश उसळला

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर येथील सोतोकान कराटे विद्यार्थ्यांनी या मर्दानी लाठी काठी कार्यक्रमात सहभागी झाले होते. जालना येथील आमदार अर्जुन खोतकर यांच्या विशेष सहकार्याने युवसेना गडकिल्ले संवर्धन कक्ष व जालना सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य सिलंबम लाठी-काठी मर्दानी स्पर्धेचे दणदणीत आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत जिल्हाभरातून तब्बल २८0 मुलांनी सहभाग नोंदवून मर्दानी परंपरेचा जयघोष केला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन संत सेवालाल महाराज प्रतिमा पूजन व आखाडा पूजनाने करण्यात आली. त्यानंतर उद्घाटक आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्वतः मैदानात उतरून लाठी फिरवत उपस्थित स्पर्धकांचे मनोबल उंचावले. त्यांच्या दमदार उपस्थितीने मैदानात टाळ्यांचा कडकडाट झाला.

राष्ट्रीय खेळाडू रुद्राक्ष भूषण यादव याने दिलेल्या थरारक डेमोने उपस्थितांची मने जिंकली. तसेच सिद्धिका गवारे व कस्तुरी हिवरेकर यांनीही आपल्या उत्कृष्ट कला सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली.

वैयक्तिक गटातही परतूर तालुका येथील विद्यार्थ्यांनी आपल्या परिने उत्कृष्ट कामगिरी करत गोल्ड मेडल व प्रमाणपत्रे पटकावली.परतूरचे कराटे कोच, रोहित माणिक जैस्वाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

जिल्ह्यातील युवकांमध्ये फिटनेस, शौर्य आणि आपल्या मराठमोळ्या मर्दानी संस्कृतीचे जतन करण्याचा संदेश या स्पर्धेतून देण्यात येत आहे . जालना जिल्ह्यात मर्दानी खेळाची परंपरा नव्या जोमाने फुलत असल्याचे या भव्य स्पर्धेतून स्पष्ट झाले असे मत अभिमन्यु खोतकर यांनी व्यक्त केले. सदर स्पर्धेत जिल्हातील विविध आखाड़े उपस्थित होते जालना शहरातून पै. सुनील खरे विजय हनुमान व्यायाम शाळा, नागेश क्षीरसागर रूपचंद वस्ताद आखाड़ा किशोर माधोवाले हे आवर्जून उपस्थित



होते तसेच मातीशी नाते असणारे मर्दानी खेळ प्रेमी यांची ही उपस्थित लक्षणीय होती.

या स्पर्धेत पंच म्हणून आंतरराष्ट्रीय सिलंबम एक्सपर्ट मास्टर संजय बनसोडे यांच्या मार्गदर्शन खाली तैयार झालेले जज प्रतीक्षा डब्बडवार, साक्षी दुग्गड़,प्रेरणा जरिंग मानस डब्बडवार तर मुख्य पंच सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन चे सचीव प्रा डॉ नितिन भक्त,असोसिएशन चे मराठवाड़ा प्रमुख भूषण यादव परतुर तालुका प्रमुख रोहित जैस्वाल, दिव्या घोड़के, यानी कामगिरी पाहिली स्पर्धा यशस्वी करण्या करिता किरनराजे देशमुख, योगेश सालुंके सखाराम लंके,सागर पाटील, स्वप्नील पाटील, अर्जुन गायकवाड ओम पाटील, दीपाली कुलकर्णी, यांनी परिश्रम घेतले